MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात


स्वा सावरकर शिशु वाटिकाच्या बालगोपालानी आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडी काढली होती कुणी विठ्ठलाच्या तर कुणी रखुमाईच्या रुपात होते




बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२९५ | गुरूवार दि.१८ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -295 | WEDNESDAY DT. 17 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# आमदार प्रकाश सोळुंकेच्या बगलात बोराडेनी दिला रेडिओ?

# भ्रष्टाचाराची बोराडेला आहे मोठी खाज बोगस कामे झाले तरी येत नाही लाज!

## उपअभियंता चंद्रकांत बोराडे चा नंगानाच आमदार प्रकाश सोळंकेला दिसेना झाला का?





- वडवणी तालुक्यातील अनेक कामांमध्ये कंट्रक्शन चा नंगानाच प्रकाश सोळंकेला दिसेना झाला का?
- माजलगाव मतदार संघातील अनेक कामातील कंट्रक्शन प्रकाश सोळुंकेच्या मर्जीतील आहेत का?
- चंद्रकांत बोराडे च्या भ्रष्टाचाराला आमदार सोळुंकेचा पाठिंबा आहे का?
- सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी चंद्रकांत बोराडे वडवणी तालुक्यातील रस्त्यांची लावली वाट.?
- कोट्यावधी रुपयाची बोगस बिले रस्त्याची दुरावस्था पाहून नागरिक हैरान?
- सार्वजनिक बांधकाम विभागाचा उपाधियंता चंद्रकांत बोराडे अनेक कंट्रक्शनच्या घशात कोट्यावधी रुपयाचा निधी घातला?
- वडवणी तालुक्यासह माजलगाव मतदार संघामध्ये आमदार प्रकाश सोळुंकेच्या नावाला चंद्रकांत बोराडे मुळे गालबोट?
- सार्वजनिक बांधकाम विभाग उप अभियंता चंद्रकांत बोराडेनी उपळी ते गावंदरा रस्त्याच्या कामात काय केलं जनतेमध्ये आ.प्रकाश सोळंके विषयी संताप?
- बाहेगव्हाण फाटा ते तीगाव रस्त्याची चंद्रकांत बोराडेनी लावली वाट?
- कंट्रक्शनवाल्यांना पोसण्यात चंद्रकांत बोराडे माहीर वाचा पुढील अंकात
- वडवणी तालुक्यात चंद्रकांत बोराडेचा नंगानाच सुरू आमदार प्रकाश सोळंके यांना दिसेना झाले का?
- परडी माटेगाव चिंचाळा कुप्पा उपळी ते गावंदरा हा रस्ता पूर्ण बोगस?
- आमदार प्रकाश सोळुंके सारखे दहा जण खिशात घेऊन फिरतो बोराडीची दादागिरी नागरिकांसह तक्रारदाराच्या अंगावर जाण्याचा प्रयत्न?
- माझं काय वाकड होणार आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचा उपअभियंता चंद्रकांत बोराडे रस्त्यावरून ये जा करणाऱ्या लोकांना अरेरावीची भाषा ?
- आमदार प्रकाश सोळुंकेला विचारा चंद्रकांत बोराडे काय चीज आहे वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांना रस्त्या संदर्भात आणि रवी ची भाषा
- वडवणी तालुक्यात आमदार प्रकाश प्रकाश सोळंकेची पकड कमी झाली का?
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे प्रकाश सोळंकेच्या बगलात रेडू देऊन गाणं ऐकवत आहे गाणं

**वडवणी ।प्रतिनिधी**

**सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचारामध्ये माहीर असलेला उप अभियंता म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाला लुटणारा तज्ञ भ्रष्टाचार अधिकारी चंद्रकांत बोराडे नावाने प्रसिद्ध आहे. चंद्रकांत बोराडे चे अनेक कारनामे वादग्रस्त तक्रारी चालू असताना मात्र चंद्रकांत बोराडे ने माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश साळुंखे यांच्या मतदारसंघांमध्ये अक्षरश: संघांत नंगा नाच चालू केला आहे. आमदार प्रकाश सोळुंके यांच्या कार्यकर्त्यांना डावलून गुत्तेदाराला पोसण्यासाठी उप अभियंता चंद्रकांत बोराडे माहीर आहे. आमदार प्रकाश सोळुंके यांना माहीत नसेल का बरं की माजलगाव मतदारसंघातील वडवणी तालुक्यामधील अनेक गावांचे रस्ते हे बोगस झालेले आहेत. याच गावांमध्ये अनेक रस्त्यांवरती ये जा करत असताना अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. चंद्रकांत बोराडे म्हणतो की मी आमदार प्रकाश सोळुंके सारखे दहा जण रोज खिशात घालून फिरणारा माणूस आहे. तुमच्या आमदाराला विचारा चंद्रकांत बोराडे काय चीज आहे. तर मी कोणाचा माणूस आहे. हे आमदार प्रकाश सोळुंके ला माहित आहे. तर यावेळी मात्र आ.प्रकाश सोळुंके यांचे कार्यकर्ते व आमदार गप्प का आहेत. अशी चर्चा माजलगाव मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे.**

परंतु यावेळी माजलगाव मतदार संघातील वडवणी तालुक्यांमध्ये उप अभियंता चंद्रकांत बोराडेने नंगाना चालू केलेला आहे. या अगोदर सुद्धा बीड तालुक्यामध्ये उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी रस्त्यांची वाट लावून कट्ट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केलेला आहे. शासकीय कार्यालय असतील किंवा शासकीय निवासस्थान असतील यावरती ही कोट्यावधी रुपयाचा खर्च दाखवून फक्त कागदावरच सर्व दुरुस्तीचे काम केलेले आहेत. यावेळी रस्त्यावरचे दुरुस्तीचे काम असतील खड्डे बुजविण्याचे काम असतील किंवा सरकारी कार्यालयाचे व निवासस्थानाचे दुरुस्तीचे कामं असे हे अनेक प्रकरण फक्त कागदावर विकास झालेला दिसून येत आहे. वडवणी तालुक्यांमध्ये चंद्रकांत बोराडे चा नंगाना चालू आहे. आमदार प्रकाश सोळंके मी जाऊन बघावं तर चंद्रकांत बोराडे म्हणतो की जाऊन सांगा माझं नाव माझं काही वाकड होणार नाही. आमदार प्रकाश सोळंके टक्केवारी मध्ये आहेत .अशी ही भाषा यावेळी चंद्रकांत बोराडे यांच्याकडून लोकांना ऐकायला मिळत आहेत.तर मी तुम्हाला गोडीतच सांगतोय तुम्ही तक्रार करू नका असेही तक्रारदाराला धमकीत आहे.? चंद्रकांत बोराडे परंतु वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागा मधील लोक हे त्याच ऐकून पुढे निघून जात आहेत. वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये चंद्रकांत बोराडे चे विषयी जास्त रोज व तक्रारी वाढत आहे. पण त्यापेक्षाही जास्त रोष हा आमदार प्रकाश सोळंके यांच्या वरती वाढत आहे. वडवणी तालुक्यातील अनेक रस्त्यांच्या कामाच्या तक्रारी वेगवेगळ्या पक्ष संघटनेतील व गावकऱ्यांनी केलेले आहेत. यावेळी मात्र माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके गप्प का आहेत का प्रश्न मोठ्या प्रमाणात मतदार संघातील जनतेला पडलेला आहे कारण चंद्रकांत बोराडे हा आमदार सोळंके यांना मोजत नाही आमदार प्रकाश सोळंकेला सत्य परिस्थिती माहिती आहे गुत्तेदार हे आमदार प्रकाश प्रकाश सोळंके मीच काम सुरू करायला लावली आहेत पण आमदार प्रकाश सोळंकेला हेच गुत्तेदार निवडणुकीमध्ये मदत करत आहेत. तर आमदार प्रकाश सोळुंके टक्केवारी मध्ये आहेत का अशी चर्चा यावेळी मतदारसंघात ऐकायला मिळत आहे ?परंतु यावेळी वेगवेगळ्या कंट्रक्शनच्या माध्यमातून आमदार प्रकाश सोळंके यांनी टक्केवारी घेतली आहे का अशी चर्चा यावेळी वडवणी तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील लोकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे ?

माजलगाव मतदारसंघात ऐकायला मिळत आहे चंद्रकांत बोराडे जर आ. प्रकाश सोळंके यांच्या बंगलामध्ये रेडिओ देऊन त्यांना गाणं ऐकवत असेल तर यावेळी मात्र आ.प्रकाश सोळंके यांच्या विरोधामध्ये माजलगाव मतदारसंघातील लोक अगोदरच रोष व्यक्त करत आहेत. परंतु भर पावसाळ्यामध्येच आ.प्रकाश सोळुंकेच्या मतदारसंघांमध्ये रस्त्याची दुरवस्था झालेली आहे . कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करून चंद्रकांत बोराडेनी कोणाला पोचत आहे असा प्रश्न यावेळी जनतेला पडला आहे?आमदार प्रकाश सोळंके यांच्या मतदार संघातील वडवणी ही तालुका आहे. वडवणी तालुक्यातील अनेक गावांमधील रस्त्याच्या कामासाठी कोट्यावधी रुपयांच्या कामांमध्ये वेगवेगळ्या कंट्रशनच्या माध्यमातून यावेळी मात्र मात्र आमदार प्रकाश साळुंखे टक्केवारीत गुंग आहेत अशी प्रतिक्रिया जर सार्वजनिक बांधकाम विभागाचे चंद्रकांत बोराडे जनते कडून ऐकायला मिळत असेल तर यावेळी आमदार प्रकाश सोळुंखे यांनी रस्त्याच्या कोट्यावधी रुपयांचा निधी आणून मतदारसंघाचा विकास हा फक्त कागदावर करून दाखविण्यासाठी आहे. का असा प्रश्न मतदारसंघातील जनता आमदार प्रकाश सोळंके यांना माजलगाव मतदार संघातील जनता विचारत आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाचा उपाभियंता चंद्रकांत बोराडे चा कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार माजलगाव मतदार संघामध्ये आमदार प्रकाश सोळंकेला दिसत नसेल का हा प्रश्न माजलगाव मतदार संघातील वडवणी तालुक्यातील जनतेला पडलेला आहे .यावेळी मात्र चंद्रकांत बोराडेनी कंट्रक्शन पुसण्या चे काम केले आहे.वेगवेगळ्या कंट्रक्शन कडून टक्केवारी मध्ये मोठा घोळ आहे. या टक्केवारी मध्ये स्थानिक नेते पण आहेत. अशी चर्चा चंद्रकांत बोराडे च्या तोंडून ये जा करणाऱ्या लोकांना ऐकायला मिळत आहे. परंतु यावेळी मात्र बोराडे सांगतो माझं कोणीच काही वाकड करू शकत नाही.

# धोंडराई पाठोपाठ तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत नरेगाचा महा घोटाळा

*सत्तेचा गैर फायदा घेत चक्क ग्रामपंचायत सदस्य पतीने मोहगणी, विहिरीचे पैसे उचलले.
*लाभार्थ्यांनी तूतीची लागवड न करता ग्राम रोजगार सेवकाला चिरीमिरी देऊन एका लाभार्थ्यांनी २६४२५७ उचलेले.
*तलवाडा गाव अंतर्गत बोगस मस्टर काढून प्रत्यक्षात काम न करता सिमेंट रोड व पेवर ब्लॉक बोगस दाखवून रुपये ८०३००० उचले.
*सिमेंट रोड गोविंदवाडी रोड ते देवीच्या पायथ्याशी गणपती मंदिर पर्यंत भाग एक व भाग दोन असे इस्टिमेट असताना संपूर्ण रोड न करता फक्त ३० टक्के रोड तयार केला व सदरील रोडचं २७ लाख रुपये उचलले तसेच सदरील रोडवर इस्टिमेट प्रमाणे खडी व मुरुम न टाकता दवई न करता फक्त सिमेंट वाळू खडी याचं मिक्स करून पांघरून रोड तयार केला या कामांमध्ये अतिशय चालाखी झालेली आहे
*नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यावर काय कारवाई करतात गावकऱ्यांचे लक्ष.

**सुमेध करडे तलवाडा**

**गेवराई तालुक्यातील धोंडरे पाठोपाठ तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत कागदी घोडे नाचून रोजगार सेवकाला हाताशी धरून कागद पुढे ढकलून थोडी थोडी सगळ्यांना चिरीमिरी देत चक्क नरेगा अंतर्गत कामाचा महाघोटाळा उघडकीस आला आहे कामे न करता बोगस मस्टर दाखवून आपल्या जवळचे नातेवाईक मित्र मंडळ आशाचे खाते घेऊन बोगस कामाची रक्कम त्यांच्या नावावर टाकून लाखो रुपये भ्रष्टाचार करण्यात आला असून याकडे नव्यानेच रुजू झालेले कर्तव्यदक्ष म्हणून त्यांची ओळख जिल्ह्यात निर्माण झालेले जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक याकडे संबंधितावर काय कारवाई करतात हे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शासनाने गोरगरीब कष्टकरी सर्वांच्या हाताला गॅरंटी देऊन कामे देण्याचे आश्वासन दिले होते त्यामुळे गरिबातल्या गरीब पर्यंत रोजगार मिळावा म्हणून नरेगा अंतर्गत योजना राबवली मात्र ही योजना जिल्ह्यात कागदी घोडे नाचून राबवण्याचे काम जोरात सुरू असून असाच एक घोटाळा तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत सुरू असून कामे न करताच लाखो रुपये उकळले असून त्यात सत्तेतीलच ग्रामपंचायत सदस्य पतीने मोहगणी तसेच जलसिंचन विहिरीचे रोजगार सेवकाला हाताशी धरून बोगस मस्टर काढले आहे त्यानंतर वरिष्ठांनीही कसलीही खातरजमा न करता डोळे झाकून बिलावर सही केलेली असल्याचे आढळून आलेले आहे एवढेच नाही तर तलवाडा गावचे आराध्य दैवत आई त्वरिता देवी च्या पायथ्याशी गणपतीचे मंदिर असून त्या ठिकाणी त्या मंदिरापासून तलवाडा गेवराई हायवे रस्ता आहे हायवे रस्त्याच्या पलीकडे हायवे रस्ता ते गोविंदवाडी रस्ता असे दोन भाग करून दोन बिले तयार करून दोन्ही बिलाची रक्कम भाग एक गणपती मंदिर ते तलवाडा गेवराई रस्ता हायवे असा दाखवला असून इथपर्यंत कामाची रक्कम सोळा लाख ८६ हजार ७९६ एवढी रक्कम मंजूर करण्यात आलेले आहे ज्यांनी काम केलेलं आहे पूर्णच बोगस काम करून १३ लाख ४४ हजार ७३५ रुपये उचलण्यात आलेले आहेत भाग दोन मध्ये गेवराई तलवाडा हायवे ते गोविंदवाडी रस्ता असं





दाखवण्यात आलेले आहे त्याची रक्कम देखील वरील प्रमाणेच मंजूर झालेले असून आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे काम न करताच तेरा लाख पंचेचाळीस हजार ७३० रुपये उचलण्यात आलेले असून संबंधित इंजिनियर यांनी प्रत्यक्ष काम न बघता मुख्यालयात बसूनच एम बी पास केलेली आहे का? इंजिनीयर विषयी चांगली चर्चा होत असताना ग्रामस्थांतू दिसून येत आहेनव्यानेच रुजू झालेले तसेच बीड जिल्ह्याचा चांगलाच अभ्यास असणारे नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे याकडे काय कारवाई करतात याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागलेले आहे

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चेतविणारे - शाहिर अण्णाभाऊ

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. साठे हे मांग (हिंदु) समाजामध्ये जन्मलेले होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाट्ये या माध्यमातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार, भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची १९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है ! इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन मध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये, ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठीभाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये, बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.

अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनं फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत.



प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले. अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले असले तरी, त्यांचा मूळपिंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि-अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण-घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरा' मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो, आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते. मुंबई मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणी कामगार या दोन गाण्यांतून मुंबईला दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याचा मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही. भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषतः मांग जातीचे प्रतीक बनले आहेत. शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग-आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अत्यंत महत्वाचे म्हणजे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष- शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांमध्ये समर्थन मिळविण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे, करीत असतात.

भाऊ साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, जिला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ अ-भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्याव्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली. १ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. सांगली जिल्हयातील वाटेगांव या जन्मगावी अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक तसेच पुणे येथे देखील स्मारक तयार करण्याचा निर्धार शासनाने जाहीर केला आहे. १९ जुलै १९९७ पासुन शासनाने राज्यातील मातंग समाजातील कलावंत साहित्यिक व समाजसेवक यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित केली, यालाच २७ वर्षे पूर्ण होत आहे. शासनाने पुरस्कृत केलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. ज्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कर्तृत्वाची नोंद घेवून आणि अख्या महाराष्ट्राला शाहिरीच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चेतविण्याऱ्या शाहिरास त्यांच्या पावन स्मृतीस मानाचा मुजरा !

प्रवीण बागडे नागपूर

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांचा १९ जुलै २०२४ रोजी बीड जिल्हा दौरा

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशावरून बीड जिल्हा संपर्कप्रमुख पदी मा.परशुराम जाधव साहेब यांची नियुक्ती झाल्यानंतर नवनियुक्त संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब युवा सेना प्रमुख माननीय आदित्य ठाकरे साहेब शिवसेना विभागीय नेते आमदार सुनीलजी प्रभु साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली



दिनांक १९ जुलै २०२४ रोजी प्रथमच बीड जिल्हा दौ-यावर येत आहेत .

सदरील दौऱ्यात बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल यशोदा येथे दुपारी १२:०० वाजता बीड जिल्हा शिवसेना महिला आघाडी युवा सेना व अंगीकृत संघटना पदाधिका-याची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली आहे तरी बैठकीला माजी मंत्री सहसंपर्कप्रमुख बदाम आबा पंडीत, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सर,सह बाळासाहेब अंबुरे साहेब, सह संपर्क प्रमुख लक्षराज सानप साहेब उपस्थित राहणार आहेत तसेच बैठकीत संघटनात्मक बांधणी व विधानसभानिहाय पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात येणार आहे तरी सदरील बैठकीला बीड जिल्ह्यातील शिवसेना महिला आघाडी व अंगीकृत संघटनांचे आजी माजी पदाधिकार्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख प्रमुख गणेश भाऊ वरेकर,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी केले आहे....!!

## धारूर येथे ज्ञानदीप विद्यालय आयोजित संत वारकरी दिंडी संपन्न

किल्ले धारूर/प्रतिनिधी

धारूर शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र आयोजित आषाढी एकादशी निमित्त संत वारकरी दिंडी संपन्न झाली. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई आधी संतांच्या वेशभूषा करून सर्वांना आकर्षित केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मान्यवरांच्या हस्तेविठ्ठल रुक्मिणी च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज




चौकामध्ये मान्यवरव वारकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी हरी नामाच्या गजरात फुगडी व पहिले रिंगण पार पडले . व पालखी शहरामध्ये मार्गस्थ झाली. पुढे हनुमान चौकामध्ये बाल चिमुकल्यांच्या दिंडीचे दुसरे रिंगण पार पडले. शेवटी बाल चिमुकल्यांचा वारकरी सोहळा आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला.

## अण्णाभाऊंच्या साहित्यातून परिवर्तनाची ऊर्जा मिळते-डॉ साबळे

सिल्लोड :- कुठल्याही शाळा, महाविद्यालय तसेच विद्यापीठामध्ये शिक्षण न घेता साहित्य क्षेत्रात क्रांती करणारे साहित्य मध्ये कोहिनूर असलेले थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केलेले क्रांतिकारी साहित्यातून सामाजिक परिवर्तनाची नवी ऊर्जा मिळते असे असे प्रतिपादन स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये डॉ सचिन साबळे यांनी केले आहे.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मातोश्री गयाबाई साबळे सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन टिळक नगर येथील साठे ग्रंथालयात करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ सचिन साबळे प्रमुख अतिथी म्हणून प्रा अनिल साबळे, पंडित आव्हाड , संजय जाधव, विशाल मिसाळ, प्रशांत साबळे, विजय आव्हाड यांची उपस्थिती होती.याप्रसंगी, बापू आव्हाड, सचिन आव्हाड, प्रशांत साबळे,प्रकाश मिसाळ, शुभम आव्हाड यांच्या सह माहेश्वरी साबळे, शिल्पा आव्हाड, संगीता



कांबळे, स्नेहल साबळे, सुबद्रा कांबळे, प्रमिला कांबळे, रूपाली आव्हाड,आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन राधा यांगड यांनी तर आभार स्नेहल साबळे यांनी केले.

## ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह निश्चित

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे बोधचिन्ह निश्चित करण्यासाठी आपण स्पर्धा घेतली होती. १५ जुलै ही अंतीम तारीख या स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आली होती.बोधचिन्ह निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या त्री सदस्यीय समितीकडे हे बोधचिन्ह निर्णयासाठी पाठवण्यात आल्यानंतर सायंकाळी या परीक्षकांनी आपला अहवाल स्वागत समितीकडे सुपूर्द केला. या स्पर्धेत चार स्पर्धकांनी आपले बोधचिन्ह संयोजकांकडे पाठवले होते. त्यापैकी तीन अंबाजोगाईचे तर एक बीड चा स्पर्धक होता. परिक्षकांनी या चार बोधचिन्ह पैकी अंबाजोगाई येथील संजय जाधव यांनी डिझाईन केलेले बोधचिन्ह निश्चित करण्यात आल्याचे स्वागत समितीला कळवले आहे.परीक्षकांच्या निर्णयानुसार ११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलन साठी संजय जाधव यांनी डिझाईन केलेले हे बोधचिन्ह आजपासूनच वापरण्याचा निर्णय मसाप आणि स्वागत समितीने




घेतला आहे. संजय जाधव यांचे अभिनंदन!



साहित्यसम्राट सत्यशोधक लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना बीड शहर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष प्राध्यापक सुशीलाताई मोराळे सचिव थोरात साहेब उत्तम पवार साहेब डी पी आय चे जिल्हाध्यक्ष सुभाष पोलीस बॉय संघटनेचे राहुल दुबाले लोणके बाळासाहेब पवार भारत कानडे आनंदजी चांदणे संतोष काळे राजेश परदेशी सचिन गवळी विलास पाखरे सानप साहेब पंकज चांदणे दत्ता वाघमारे अविनाश चांदणे योगेश वाघमारे प्रवीण चांदणे बबन जी थोरात आधी कार्यकर्ते दिसत आहेत

## राजेगांव येथील अन्यायग्रस्त दलित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी तीव्र आंदोलन उभं करणार मानवी हक्क अभियान

### मानवी हक्क अभियान च्या कार्यकर्त्यांनी घेतली अन्यायग्रस्त महिलांची भेट

प्रतिनिधी,सुनिल थोरात

राजेगाव येथील काही महिला मारफळा येथे खुरपणीसाठी गेल्या होत्या या महिला अगोदर रोजाने काम करत होत्या पण त्यांच्या मागे उभे राहण्यासाठी कोणी नव्हते म्हणून शेतमालकाने त्यांना सांगितले की तुम्ही हे गुत्ते घ्या व खुरपणी करा. महिलांनी ते गुत्ते घेऊन खुरपणी वेळेच्या आधी पूर्ण केली त्यामुळे शेताचे मालक अनिल गंगाधर राठोड यांनी या महिलांना काम एवढ्या लवकर कसे काय झाले म्हणून जातीवाचक शिवीगाळ व दगड गोटे तसेच लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली यावरून तलवाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला आहे. सदरील घटनेची दखल घेऊन मानवी हक्क अभियान च्या कार्यकर्त्यांनी राजेगाव येथे जाऊन त्या महिलांची भेट घेतली व सविस्तर माहिती जाणून घेतली आणि सांगितले की आता मॅनेज व्हायचं नाही मानवी हक्क अभियान शेवटपर्यंत तुमच्या सोबत आहे कोणाच्याही दबावाला बळी न पडता ठामपणे उभे राहा असे सांगितले.मानवी हक्क अभियान या संघटनेचे कार्यकर्ते यांचे असे म्हणणे आहे की या घटनेला पाच दिवस उलटल्यानंतरही



पोलीस प्रशासनाने आरोपींना अजून अटक केलेली नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. फरार आरोपींना तात्काळ अटक करा व ट्रॉसिटी क्टनुसार दोषीवर कठोर कारवाई करावी व त्या महिलांना न्याय द्यावा. तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत आर्थिक सहाय्य करावे. या घटनेची दखल महिला आयोग, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुख्यमंत्री,गृहमंत्री यांनी घ्यावी व कठोर कार्यवाही करावी नसता मानवी हक्क अभियान तीव्र स्वरूपाचे आंदोलन महाराष्ट्रभर उभे करणार. यावेळी मधुकर कांबळे, धोंडीबा हातागळे, बाबासाहेब थोरात, संदीप वाघमारे, रमेश जाधव, कचरू कांबळे, संजय वाघमारे, रमेश गवळी, प्रकाश थोरात, सुनिल थोरात, सुंदर भिसे, सुधाकर भिसे, राधे कांबळे, सोनाजी कारके, मारुती भिसे, बबन खंडागळे, मच्छिंद्र उफाडे, अनिकेत वाघमारे, बाबासाहेब आडागळे, अक्षय थोरात, आकाश लोखंडे,आदि कार्यकर्ते उपस्थित होते.



आज सकाळी बीड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करताना.. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते, पृथ्वीराजे पंडित साहेब, चखच् पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष शफीक भाऊ शेख, प्रा गोपाळ बप्पा धांडे,स्वाभिमान संघटनेचे अध्यक्ष सचिन उबाळे, पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल भैय्या दुबाळे , नगरसेवक सनी भैय्या वाघमारे, समाजसेवक भारत आण्णा कांबळे, डिगु नाना फाटे पाटील, सुनील कांबळे साहेब, प्रदिप थोरात अध्यक्ष, अक्षय भाई कोकाटे,दिपक भैय्या घोरपडे,सागर धन्वे, सुधाकर डोंगरे, बबलू गरजे, गौरव वैद्य, विलास जोगदंड, ... आयोजन, विजय चांदणे, जय चांदणे, सचिन गालफाडे कापसे माम, सतिश थोरात, शैलेश दोडके, गणेश भिसे, अजय दळवी, विजय धुतवळे, ओमकार चांदणे, गणेश चांदणे,

## टि.सी. हरवला आहे

आरती संदिपान परदेशी रा.एकदरा या नावाचा कला व विज्ञान उच्च माध्यमिक आश्रमशाळा वारोळा १२ वी पासचा टीसी माजलगांव -बीड प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क - ८४५९२ ६६९४३

# आषाढी एकादशी निमित्त निघाली शिवभूमीची वारी

## पंढरीच्या दारी, म्हणती वारकरी , रामकृष्ण हरी



शिवभूमी विद्यालय यमुनानगर निगडी येथील विद्यालयात आषाढी एकादशीचे औचित्य साधून शाळेच्या आवारात सालाबाद प्रमाणे वृक्ष पूजन आणि वृक्षारोपण यांचा शुभारंभ करण्यात आला या सोहळ्याचे आयोजन माननीय मुख्याध्यापिका सौ पाटील अश्विनी आणि शाळेतील उपक्रमशिल तंत्रशिक्षिका कवयित्री लेखिका कोठेकर योगिता यांच्या हस्ते पार पाडण्यात आला . त्यांनी विद्यार्थ्यांच्या वारकरी पोषाखातील फोटोंचे कटआऊट उभारून पंढरीच्या दिंडीचे दृश्य या सोहळ्यात उभारले होते . त्याद्वारे जनजागृतीचे बोर्ड लावून पाणी वृक्ष व पुस्तकांचे महत्व सांगण्यात यश आले विद्यार्थ्यांनी सुंदर पालख्या टाकाऊ खोक्यापासून तयार केल्या . सुंदर रित्या संतांची विठ्ठल रघुमाची चित्रे रंगवली सुशोभित केली . तसेच या प्रकल्पांतर्गत वृक्ष पूजन आणि वृक्षारोपण विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आले . मुख्याध्यापकांच्या हस्ते रोपट्याचे पूजन करून तसेच ग्रंथदिंडी काढून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांनी भजने म्हणून दाखवली तसेच घोषवाक्य म्हणत विद्यार्थी पालखी सोहळ्यामध्ये हातात जागृतीचे बोर्ड घेऊन ढोल ताशावर पाऊले टाकीत प्रभात फेरीत नृत्य करण्यात दंग झाली होती या प्रभात फेरीत विठ्ठल रखुमाईची वेशभूषा खास आकर्षण ठरले तसेच संताच्या वेशभुषेने सर्वांचे ध्यान आकर्षून घेतले यावेळी पालक वर्ग ही प्रभात फेरीसाठी उपस्थित होतात फुगड्या घालून पालकांनीही प्रभात फेरीचा आनंद घेतला .

# आरोग्य सेवेतुन सुद्धा ईश्वर सेवा घडते -अनिल जगताप

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आषाढी एकादशीनिमित्त गजानन हॉस्पिटल च्या त्वचारोग तज्ञ डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांचे काल दि. १७ जुलै रोजी श्री क्षेत्र नारायण गड ता. जि. बीड येथे मोफत त्वचारोग तपासणी, व उपचार शिबीर संपन्न झाले. या शिबिरास आशिर्वाद रुपी शुभेच्छा ह.भ.प. महंत शिवाजी महाराज मठाधिपती श्री क्षेत्र नारायणगड यांनी दिल्या, आषाढी एकादशीचे अवचित्य साधून श्री क्षेत्र नारायण गड येथे सकाळी १०.०० ते दु. ४.०० वाजेपर्यंत मोफत त्वचारोग तपासणी व उपचार शिबीराची उभारणी केली होती. सुप्रसिद्ध त्वचारोग व सौंदर्यशास्त्र तज्ञ श्री गजानन स्किन क्लिनिकच्या संचालक डॉ. ऐश्वर्या खंडागळे यांनी शिबिरात तब्बल १५७ रुग्णांची मोफत तपासणी करून मोफत औषध उपचार दिले.

या शिबिरात वारकरी, महिला, पुरुष, भाविक भक्तांसह पोलीस कर्मचारी यांनी पण उपचार घेतले. आषाढी एकादशी निमित्त घेण्यात आलेले, हे



शिबीर अत्यंत महत्वाचे ठरले असून वारकरी, भाविक भक्त व ग्रामीण भागातील लोकांना याचा खुप चांगल्या पद्धतीने लाभ घेता आला, या शिबिरासाठी प्रमुख उपस्थिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांची होती. याबरोबरच बळीराम गवते, भगवानराव गवते, डॉ. अमोल खंडागळे पुजा ताई मोरे, सुनिल भाऊ अनभुले, सुनिल गवते यांची देखील उपस्थिती लाभली होती. या शिबिराचे आयोजन चंद्रसेन खंडागळे तसेच सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी केले होते व या पुढे हि समाज हितासाठी असे आणखी आरोग्य शिबिरे घेण्याचा संकल्प केला

# बीडच्या मातीत अमेरिकन वोकॅडाचे उत्पादन


बीड ।प्रतिनिधी

पाणीटंचाई अन डोंगराळ जमीन असतानाही बीड तालुक्यातील शिवनी येथील प्रगतशील शेतकरी परमेश्वर थोरात यांनी एका एकरात तब्बल पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. या शेतकऱ्याने अमेरिकन वोकॅडा या पिकाची लागवड केली.त्यांचे पाहून इतर २०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी या पिकाची लागवड केल्याचे सांगण्यात आले. वोकॅडा फळाने बीपी ,शुगर,कॅन्सर,मोतीबिंदू ,त्वचारोग , केसगळती आजार नियंत्रित केले जातात .त्यामुळे फळाची मागणी वाढली असून महाराष्ट्रसह देशात वोकॅडाची विक्री होत आहे. वोकॅडा या फळाला



प्रतिकिलो बाराशे रुपये भाव असल्याने दोन ते तीन फळांचेच बाराशे रुपये उत्पन्न मिळत आहे. कमी पाण्यात लागवड होणारे बाराशे रुपये प्रतिकिलोचे इतर पिक नसल्याने शेतकरी याकडे आकर्षित होत आहेत. पारंपारिक पिके कापूस, तूर या पिकांना बाजूला करत तरुण शेतकरी वोकॅडा पिकाकडे वळत आहेत. वोकॅडा पिकाच्या यशस्वी प्रयोगानंतर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी परमेश्वर थोरात यांना बोलावून त्यांचे कौतुक केले तसेच मी देखील एक एकरात या पिकाची लागवड करणार असल्याचे सांगितले.

काल दिनांक १६ जुलै रोजी अशोक आढाव उपविभागीय कृषी अधिकारी वैजापूर ,डॉक्टर संजय पाटील प्रमुख शास्त्रज्ञ मोसंबी वैजापूर, अर्जुन चव्हाण कृषी पर्यवेक्षक बीड, दिलीप पाखरे कृषी अधिकारी वैजापूर यांनी भेट दिली व कौतुक केले. अवोकॅडोचे रोपे घेऊन ते लावगड करणार आहेत असेही सांगितले



संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत क्रांतीकारी शाहिरीतून योगदान देणारे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे हे मानवतावादी लेखक होते. कष्टकरी, दिनदुबळ्यांच्या उत्थानासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. अण्णाभाऊ मानवतावादाचे खरे शिलेदार होते. त्यांच्या स्मृतिदिना निमित्त विनम्र अभिवादन! संचार उमाप वीर उमाप

### धारूर ग्रामीण रूग्नालयाचे रस्त्याची दुरावस्था तात्काळ

# दुरूस्तीची मागणी नसता आंदोलनाचा इशारा

किल्लेधारुर । प्रतिनिधी

धारूर येथील ग्रामीण रुग्नालया कडे जाणा-या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्तत्याने गाडी चालवणे सोडा पायी जाणे येणे मुश्कील झाल्याने रुग्नाना व रुग्नाचे नातेवाईकाना अनेक समस्याना तोड़ द्यावे लागत आहे त्यामुळे तात्काळ हा पुर्ण रस्ता सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील युवक सामाजीक कार्यकर्त कैलास बोरगावकर व नागरीकानी केली आहे

धारूर ग्रामीण रुग्नालय हे धारूर ग्रामिण मध्ये असून ग्रामीण रुग्नालया कडे जाणारी येणारी नागरीकाची संख़्या मोठी आहे रुग्न वाहीणी व ग़ंभिर रुग्नाला याच़ रस्त्याने ने आण करावी लागते सभ़ाजीनगर धारूर ग्रामीण मधील



श्री हनूमान मंदीर ते ग्रामीण रुग्नालय या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्या वर सर्वत्र खड्डेचे साम्राज्य झाले असून पावसाळ्यात साचणारे पाण्या मुळे दुचाकी चारचाकी वाहण चालवणे मुश्कील होते. पायी चालताना पादचारी रुग्नाला व सोबतचे नातेवाईकाला चालणे मुश्किल होते खड्डा चुकवताना पाणी कधी अंग़ा वर येईल उडेल हे सांगणे मुश्कील रुग्नाना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते वारंवार मागणी करून ही या रस्ता दुरूस्ती कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे रुग्नाची व नातेवाईकाची गैरसोय टाळण्या साठी व गंभिर रुग्नाचे प्राण वाचवण्या साठी तात्काळ या रस्त्याची दुरूस्ती करावी व पुर्ण रस्त्याचे सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील सामाजीक कार्यकर्ते कैलास बोरगावकर यांनी केली आहे

# लाडकी बहीण योजनेचा महिलांनी लाभ घ्यावा - शिवराज पवार

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनांचे अर्ज भरण्यासाठी संजयनगरच्या महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अगंनवाडी सेविका व नगरपालिकेच्या वतिने संजयनगरमध्ये मोफत नोदणीसाठी कॅप

गेवराई: मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना फार्म भरुन घेण्यासाठी प्रभागात मोफत नोंदणी करण्यासाठी कॅप सुरु करण्यात आला आहे तरी महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवराज पवार यांनी संजयनगर येथे सुरु असलेल्या कॅपला भेट देऊन महिलाना आव्हान केले आहे

महायुती सरकारकडून महिलासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत १५०० रु.महिना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे या योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या मार्गदर्शनाने अंगणवाडी सेविका परविन बाजी, ,नगरपालिकेचे प्रकल्प आधिकारी आर. ऐ.वाव्हळे,गणेश औटी, आदिच्या उपस्थितीत मोफत नोदणी संजयनगर येथील हनुमान मंदिर येथे आज दि.१७ जुलै रोजी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थीचे अर्ज भरून घेऊन नोद करण्यात आली आहे यावेळी दादासाहेब



गिरी,राम पवार, लक्ष्मण चव्हाण, योगेश मोटे,पिंटु साळवे, प्रकाश उपळकर, दाऊद पठाण, शेख ईर्शाद, शेख बाबा,शेख मुददशीर, शेख नसिर,मगन परदेशी,राजेंद्र तापडीया ,माऊली तौर, प्रकाश बर्डे, नारायण पवार, हारी क्षीरसागर, आदिनी मदत केली होती

महायुती सरकारकडून महाराष्ट्रातील महिलासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत १५०० रु.अनुदान देण्यात येणार आहे यासाठी रेशनकार्ड, मतदानकार्ड,बॅकेचे पासबुक झेरॉक्स,पासपोर्ट साईज फोटो, इतर कागदपत्र आवश्यक आहेत तर रेशनकार्ड नसेल तर उत्पन्न प्रमाणातपत्र, आवश्यक आहेत तर गेवराई नगरपालिकेकडून आयोजित कॅपमध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# राज्य सरकारने शिक्षकांच्या प्रश्नाला गांभीर्याने घ्यावे , आश्वासन नको,शासन निर्णय हवा- डॉ.जावेद शेख

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा शिक्षक हा कणा असून शिक्षकांनाच विनावेतन व अंशतः पगारीवर काम करावे लागते ही निंदनीय बाब आहे. कारण गेल्या वीस वर्षापासून काही शिक्षक आजही विनावेतन काम करत आहेत इतकेच नाही तर काही शिक्षक विनावेतन काम करून सेवानिवृत्त ही झाली आहेत परंतु येणाऱ्या प्रत्येक सरकार ने शिक्षकांना फक्त मोठमोठे आश्वासन देऊन वेळ मारून घेण्याचे काम केले आहे प्रचलित धोरण लागू केल्यानंतर महायुती सरकारने हे धोरण बंद केले त्यावेळी शिक्षण मंत्री विनोद तावडे होते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. विरोधी पक्षात असताना आझाद मैदान येथे स्वतः देवेंद्र फडणवीस आंदोलन आंदोलनकर्त्या शिक्षकांना मोठमोठ्या आश्वासनाची खैरात मांडली होती परंतु ही आश्वासनाची खैरात फक्त आश्वासनच राहिले कारण त्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले त्यांनी पहिले प्रचलित धोरण बंद करून सरकारकडे ज्यावेळी पैसा उपलब्ध होईल त्यावेळी आम्ही पुढील टप्पा देऊ असा जीआर काढून शिक्षकांच्या जीवनाशी खूप मोठा खेळ खेळला गेला. गेल्या वीस वर्षापासून काही शिक्षक विनावेतन काम करत असताना सुट्टीच्या दिवशी भाजी विकणे दूध विकणे इतकेच नव्हे तर मिस्तरी काम करणे भंगार धंदा करणे अशा प्रकारचा व्यवसाय करून आपल्या मुलाबाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी वाटेल ते काम करावे लागत आहे परंतु सत्तेत असणाऱ्या प्रत्येक मंत्र्यांना याचे काहीही गांभीर्य वाटत नाही कारण बरोबर आहे जे मंत्री एसी



मध्ये बसून आपली वेळ मारुन घेत आहेत यांना शिक्षकांच्या प्रश्नांना विचार करण्यास वेळही नाही किंवा शिक्षकांच्या प्रश्नावर उत्तर देण्यास असमर्थ ठरत आहेत. शिक्षक आमदार निवडणूक झाली मोठ मोठी आश्वासने दिली गेली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर आपलं सरकार गरिबीचं सरकार आहे हे सरकार देणार आहे, निवडणूक झाली की मी आपणाला टप्पा वाढ देणार आहे तुम्ही काळजी करू नका अशी मोठी आश्वासने देऊन वेळ मारून घेतली परंतु एकीकडे मुख्यमंत्री मी देणार आहे असे म्हणत आहेत तर दुसरीकडे शिक्षण मंत्री केसरकर सप्टेंबर पर्यंत काहीही करता येत नसल्याचे बोलताना दिसत आहेत. म्हणजे आश्वासने देऊन आंदोलने थांबवण्यात किती मोठेपण आहे असे जर मंत्र्यांना वाटत असेल तर हे साफ चुकीचे आहे. निगरगट्ट सरकारला शिक्षकांच्या परिवाराची चिंता नाही त्यांना फक्त चिंता आहे ती स्वतःच्या खुर्चीची. स्वतःच्या सत्तेची. परंतु आता शिक्षकांनी ठरवले आहे येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीमध्ये पोकळ आश्वासने देणाऱ्या मंत्र्यांना थारा द्यायचा नाही आणि आपल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी आंदोलन हाच मोठा पर्याय आहे असे वाटू लागले त्यामुळे विनाअनुदानित अंशतः अनुदानित शिक्षक प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी आंदोलनासाठी सज्ज झाले पाहिजे इतकेच नव्हे तर शाळा बंद आंदोलन केल्याशिवाय आता पर्याय उरला नाही कारण प्रत्येक वेळेस आश्वासने देऊन वेळ मारून घेत आहेत आता ते चालणार नाही आता शिक्षकांनीही जागे झाले पाहिजे आपल्या मुला बाळांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी आता आंदोलन शिवाय पर्याय नाही शिक्षक प्राध्यापक शक्यता कर्मचारी यांनी जर निश्चय केला की येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत अशा थापा देणाऱ्या मंत्र्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहायचे नाही.

महाराष्ट्रातील विनाअनुदानित , अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, सेवा संरक्षण, प्रचलित धोरण, शासन निर्णय त्वरित काढून शिक्षकांच्या प्रश्नाला गांभीर्याने घ्यावे असे आवाहन डॉ.जावेद शेख यांनी केले आहे.




# जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वारकरी दिंडीने गांजपूरकरांचे लक्ष वेधले

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये आघाडीवर असलेल्या जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित काढलेल्या विद्यार्थ्यांचे वारकरी दिंडीने गांजपुरकरांचे लक्ष वेधले. या दिंडीतून मोठ्या प्रमाणात हरी नामाचा गजर करण्यात आला. टाळ मृदंगाच्या गजरात दिंडीतील चिमुकल्या वारकऱ्यांनी हरिनामाचे विठ्ठलाचे नामस्मरण केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गांजपूर जीवन शिक्षण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने आषाढी एकादशी निमित्य विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी गावातून काढली होती या वारकरी दिंडीमध्ये विठ्ठल रुक्माई संत तुकाराम ,संत ज्ञानेश्वर ,जनाबाई ,मुक्ताई अशा वेगवेगळ्या वेशभूषा साकारल्या होत्या गावांमध्ये दिंडी गेल्यानंतर त्या ठिकाणी रिंगण सोहळा घेण्यात आला त्यामध्ये विद्यार्थी शिक्षक गावातील ज्येष्ठ नागरिक संत यांनी फुगड्या खेळून वारकरी दिंडीमध्ये रंगत भरली. विठ्ठल नामाचा गजर करत ही दिंडी गांजपूर गावातून काढण्यात आली या दिंडीतील विठोबा रुक्माई चे विविध ठिकाणी पूजनही करण्यात आले. दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी भजन हरिपाठ घेऊन विठ्ठलाचे नामस्मरण केले.

या दिंडीत प्राचार्य विजयकुमार मुंडे, आरुण समुद्रे, महादेव केदार, नाथा ढगे, मंगल वटाणे, भारती सोनवणे, प्रमोद कोमटवार , पवन पूर्णे, अक्षय ओव्हाळ व जीवन शिक्षण विद्यालयातील कर्मचारी सहभागी झाले होते विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून आला.

# २४ तासांची नोटीस देवुन तीव्र आंदोलन करणार - इमरान खान

माजलगांव ।प्रतिनिधी

आगार प्रमुख यांना वारंवार लेखी व तोंडी कळवुन हि आपल्या कार्यालयाकडुन संबंधित मागण्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी कोणतेही ठोस पाऊले उचलेली नसल्याने आपण या मागण्यांचा तात्काळ विचार करुन त्या पुर्ण कराव्या.

बसस्थानकाच्या समोरुन पंढरपुर पालकीमार्ग जात असुन या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी असते आपल्या बसस्थानकाच्या आवाराच्या संरक्षण भिंतीच्या आत मोठमोठे बॅनर होर्डिंग लागलेले आहेत. याठिकाणी रोजच वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर लावले जात असतात शहरातील विविध शाळा मधील शालेय विद्यार्थी या ठिकाणाहुन रोज ये-जा करत असतात. परंतु सदरील लोखंडी बॅनर होर्डिंग अत्यंत कमकुवत झालेले असल्याने वाऱ्या-पावसाने ते रहदारी मार्गावर किंवा तेथील बसणाऱ्या फळविक्रेतेच्या अंगावर पडुन मोठी जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. सदरील बॅनर होर्डिंग काढुन रस्त्यापासुन किमान २०-३० फुट आपल्या आवारात आत



घेण्यात यावे

व्यवस्थापक आपले बसस्थानक मध्यवर्ती बसस्थानक असल्याने बसस्थानकाच्या आवारातुन सुटणाऱ्या एस.टी. बसेससाठी जो रस्ता आहे. त्या रस्त्यावर खाजगी अवैध वाहतुक करणारे जीप गाड्यावाले . माजलगाव बसस्थानकाच्या आवारात बस जाण्याच्या मार्गावरच आपली वाहनी उभी करुन एस.टी.च्या प्रतिक्षेतचेथांबलेल्या प्रवांश्याना त्यांच्या खाजगी प्रवासीमध्ये बसवुन मोठ्या प्रमाणात हे

महामंडळाच नुकसान करत आहेतच विशेष या खाजगी वाहना मुळे बसच्या जाण्या-येण्याच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. या वाहनाचे तात्काळ बंदोबस्त करा. बसस्थानकाच्या आवारात शेजारीच फळफ्रुट विक्रेते व भाजीपाला विक्रेते बसलेले असतात विक्री संपल्यानंतर उरणारे सडके साहित्य हे लोक बसस्थानकाच्या आवारात हे साहित्य टाकत आहे. जेने करुन अत्यंत दुर्गंधी व रोगराई पसरण्याची दाट शक्यता असल्याने आणि प्रवाश्यान सोबत लहान बालके असल्याने या दुर्गंधीयुक्त घाणीची तात्काळ जे.सी.बी द्वारे किंवा आपल्या मार्फत तात्काळ त्याची साफसफाई करुन घेण्यात यावी,

४. बसस्थानकाचा परिसर हा उघड्यावर असल्याने येथील प्रवासी व आसपास चे विक्रेते आणि बाजुचे दुकानदार हे बिंधास्तपणे उघड्यावरच लघुशंका करत असल्याने आणि सध्या जुने सार्वजनिक शौचालय ह्या ठिकाणी प्रवासी महिला भगींनी त्या शौचालयकडे जात असताना पुरुष मंडळी उघड्यावरच लघवी करत असल्याने त्या महिलांना अत्यंत शरमेने मान खाली घालुन हे जुने शौचालय वापरण्यास येणे जाने करावे लागते. आपल्याकडे नविन सार्वजनिक शौचालय हे तयार असताना ही ते का चालु केले नाही? हा मुद्दा आहे. आणि म्हणुनच हे नविन सार्वजनिक शौचालय तात्काळ चालु करण्यात यावे जेने करुन प्रवास्यांची गैरसौय होणार नाही.

तरी वरील प्रमुख मागण्यांवर गांभीर्य पुर्वक विचार करुन सदरील मागण्या तात्काळ निकाली काढाव्या अन्यथा राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने २४ तासांची नोटीस देवुन तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.



## आषाढी एकादशीनिमित्त शिवसेनेकडून महाप्रसादाचे वाटप!

### जगताप, मुळूक यांच्याकडून आषाढी एकादशीच्या भाविकांना शुभेच्छा

बीड ।प्रतिनिधी

आषाढी एकादशी हा उपवासाचा दिवस लक्षात घेऊन भाविकांसाठी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी एकादशीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड

बीड तथा सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड येथे महाप्रसादाचे आयोजन केले होते. यादरम्यान बीडमधील भक्त भाविकांना तीन क्विंटल साबुदाणा खिचडी आणि फळांचे वाटप करण्यात आले. काल सकाळी १०. वाजल्यापासून महाप्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले होते. याप्रसंगी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत महाप्रसादाचा लाभ घेतला. जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी स्वतः उपस्थित नागरिकांना फराळ वाटप केले. याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या बीडमधील भक्त भाविकांना अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान बीड शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# घरफोडीतील साडेचार लाखाचा मुद्देमाल फिर्यादीस केला परत

बीड शहर पोलिसांची कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २१/०५/२४ यातील फिर्यादी मोहम्मद शकीद्दीन खाजा मोईनुद्दीन, राहणार कागदी दरवाजा खासबाग, देवी रोड , बीड. हे घरी नसताना त्यांच्या घरात घुसून अज्ञात आरोपीने कपाटात ठेवलेले साडेतीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे बिस्किट कपाट तोडून चोरून नेले होते. परंतु बीड शहरच्या डीबी पथकाने हा गुन्हा २४ तासाच्या आत उघडकीस आणून यातील आरोपी सय्यद रिहान सय्यद



अब्दुल रजाक राहणार कागदी दरवाजा या तात्काळ अटक केले होते . यातील मुद्देमाल सोन्याचे बिस्किट त्यांनी हस्तगत केले होते ते बिस्किट आज रोजी फिर्यादीस सन्मानाने परत केले आहे. यातून परिसरातील लोकांनी पोलिसांच्या कामगिरीबद्दल कौतुक व्यक्त केले आहे.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, मनोज परजणे, अशपाक सय्यद, सुशील पवार यांनी बालाजी मुळे यांनी पार पाडली आहे.



**टाकरवण । माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथे साठेनगर समाज मंदिर व साठे चौकात स्मृतीदिनानिमित्त सहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी किरन धोत्रे, अशोक खुळे, सुनील धोत्रे, आबासाहेब कांबळे, संतोष ज्ञा आडागळे, गजानन आडागळे, संजय आडागळे, विष्णु धोत्रे, लखन आडागळे, इंद्रजीत आडागळे, राहुल आडागळे, वैभव आडागळे, संतोष आ आडागळे, करन पट्टेकर, रामा आडागळे, किसन धोत्रे, सुदाम नाटकर, वचिष्ट आठवे, गणेश आडागळे, रामदास आडागळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# कायदे अंतर्गत कारवाई करा- महाराष्ट्र मुस्लिम युवा प्रतिष्ठान

माजलगाव ।प्रतिनिधी

गाजापुर (विशालगड) मध्ये झालेल्या निंदणीय घटना ज्यामध्ये अतिक्रमण च्या नावाखाली विशेष करून मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळांना ( मस्जिद, दर्गा) व धार्मिक पुस्तके (पवित्र कुराण) यांची विटंबना करण्यात आली. तसेच विशेष करून मुस्लिम समाजाचे घरांना टार्गेट करण्यात आले. काय ना काही कारणे काढून अशा प्रकारे मुस्लिम समाजावर अन्याय अत्याचार होत आहे.

मुस्लिम समाजावर अतिक्रमण नावाने जाणून बुजून हल्ले चढविणे कोणतेही मुद्दे समोर करून त्रास देण्याचा काम या दंग्या खोराकडून होत आहे अशा दंगेखोरांना प्रशासन प्रतिबंध करावे. मागण्या ण-झ- कायदे अंतर्गत हलेखोरांवर कडक कारवाई करण्यात यावी. संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यावर तात्काळ निलंबन करण्यात यावे.झालेल्या हल्ल्यामध्ये धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाचे घराची शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी. हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या प्रत्येकी ५ लाख रुपये



सरकार तर्फे देण्यात यावे,मुस्लिम समाजासाठी संरक्षण कायदे तात्काळ विशेष अधिवेशन बोलावून तात्काळ पारित करण्यात यावे.महाराष्ट्रामध्ये विशेष करुण मुस्लीम समाजा सोबत अशा वाढतच आहे. सरकाने याची दखल घ्यावीया सर्व घटनेची सखोल चौकशी उखऊमार्फत करण्यात यावी. वरील मागण्या बाबत, प्रशासना तात्काळ दखल घेऊन हल्लेखोर ण-झ- कायदे अंतर्गत कडक कारवाई ची अंमलबजावणी करावी अशा घटना पुन्हा निर्माण होणार नाही आणि कोणत्याही समाजावर अन्याय अत्याचार व हल्ले होणार नाही याची दखल घ्यावी, अशी मागणी महाराष्ट्र मुस्लिम युवा प्रतिष्ठान वतीने मा.उपविभागिय अधिकारी मार्फत मा.जिल्हाधिकारी यांनी निवेदन मार्फत करण्यात आली आहे.त्यावेळी ,सुमेर पटेल, समशेर पठाण, अतिक पठाण, मुस्ताक कुरेशी, इरफान पठाण,गुड्डू खतीब, वसीम शेख, अझहर शेख,फेरोज शेख,माजेद कुरेशी, इमरान कुरेशी, जावेद कुरेशी व इतर अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

# उपेक्षितांचे नायक लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे उपेक्षितच..!!सुरज साठे वाटेगाव

आजवरच्या जगाच्या इतिहा सात असा एकच साहित्यिक होऊन गेला. ज्याने आपल्या लेखणीतून एका भिकाऱ्याला आपल्या कथेचा नायक बनवला अन् एका वेश्येला कथेची नायिका बनवली. ते साहित्यिक म्हणजे लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे.

अण्णाभाऊ साठे यांची सुलतान कथा व चित्रा ही कादंबरी रशियन भाषेत भाषांतर झाली. अन् रशियन लोकांनी भारताचा मॅक्झिम गोर्की ही उपमा अण्णाभाऊ साठे यांना दिली. रशियन लोक अण्णाभाऊंना सुलतान फेम अण्णाभाऊ म्हणू लागले. खर बघायला गेलं तर काय असेल या दोन्ही कथांमध्ये की रशियन जनतेने अण्णाभाऊंना थेट भारताचा मॅक्झिम गोर्की घोषित केलं. खर तर सुलतान नावाचा एक अनाथ तरुण बेकारीला अन् धर्मांधतेला कंटाळून शेवटी भिकारी झाला. अन् आपल्या फाटलेल्या झिंदगीला ठिगळ लावू लागला. अन् अखेर या जगाला क्रांतिकारी धडा तो देऊ लागला. अशा या तरुणाला सुलतानाला त्याच्या दारिद्र्य, व्यथा, संघर्षाला अण्णाभाऊंनी भारतासमोर नाही तर जगासमोर मांडल. दुसरी महत्त्वाची कादंबरी जिला संपूर्ण रशियाने डोक्यावर घेतलं ती कादंबरी म्हणजे चित्रा. खरतर या कादंबरीची नायिका एक वेशा स्त्री आहे. इथली व्यवस्था अन् या व्यवस्थेतील नपुंसक मानस एका स्त्रीला या नरकात कसे ढकलतात अन् ती ही नायिका आपल्या जीवनाशी या व्यवस्थेशी कसा संघर्ष करते हा पट अण्णाभाऊंनी मांडला. अशा हजारो उपेक्षितांना प्रथमतः जग पटलावर कोणी नेल असेल तर ते अण्णाभाऊ साठे हेच आहेत.

मी मूळचा वाटेगावचा असल्याने लहानपणापासून चळवळ माझ्या डोक्यात भिनतच होती. मी इयत्ता सहावीत असताना, माझ्या जीवनातील पहिलं पुस्तक म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी वाचली. अन् ती कादंबरी वाचत असताना माझ्या डोळ्यातून आपोआप पाणी गळायच अन् कंठ दाटून यायचा. माझं मन मला म्हणायचं माझ्या गावातला, माझ्या रक्तातला हा नायक अन् ते माझे पूर्वज इथल्या जुलमी व्यवस्थेशी लढतात, झुंजतात, प्राणाची बाजी लावतात. अन् ही जुलमी व्यवस्था, इथले धनदांडगे साऱ्या दुनियेचं दुःख त्यांच्या पदरी टाकून मोकळे होतात. माणूस असून त्यांना जनावराची वागणूक देतात. त्यांना दावणीला बांधतात, त्यांचा कडेलोट करतात, त्यांना साखळदंडात जोखडतात हे सर्व वाचून माझ्या अंगाची लाही लाही व्हायची अन् अस वाटायचं की फकिराचा तो लढा आपण तलवार



हातात घेऊन पुरा करायचा अन् या जुलमी व्यवस्थेला कापून काढायचं. ती फकिरा कादंबरी इयत्ता सहावीत असताना माझ्या तोंडपाठ झाली होती. माझं वय वाढत होत पण हृदयातील ती आग थंड होत नव्हती. वाढत्या वयानुसार समज येत गेली अन् तलवारीची जागा लेखणीने घेतली. अन् ती लेखणी घेऊन या व्यवस्थेविरुद्धच्या लढाईला मी आरंभ केला. ही गोष्ट सांगायचा हेतू एवढाच की अण्णाभाऊ साठे यांचं एक पुस्तक हजार पुस्तकांच्या बरोबरीच आहे. खरतर अण्णाभाऊ नसते तर फकिरा हा नायक जगासमोर कधीच आला नसता. अण्णाभाऊंनी अशा हजारो नायकांना आपल्या लेखणीतून, वाणीतून जगासमोर मांडले अन् खऱ्याअर्थाने अण्णाभाऊ साठे हे उपेक्षितांचे नायक झाले.

हेच उपेक्षितांचे नायक अण्णाभाऊ या अण्णाभाऊंना मात्र या देशाने अजूनही उपेक्षितच ठेवलेलं आहे. आजवरच्या शासनर्त्यांनी अण्णाभाऊंना उपेक्षितच ठेवलेलं आहे. एवढ्या मोठ्या महान क्रांतिकारकाच राष्ट्रीय स्मारक या देशात अद्यापही नाही. या देशातील शासनकर्ते या देशाचा सर्वोच्च भारतरत्न हा पुरस्कार माणसाचं कर्तृत्व बघून नाही तर जात बघून देतात. ही या देशाची शोकांतिका आहे. अण्णाभाऊ आपल्या एका सहकाऱ्याला म्हणाले होते की मी जगात वाढणार अन् खरच आज अण्णाभाऊ जगात गाजत आहेत.आज १८ जुलै साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्यास्मृतिदिनानिमित्त त्यांच्या क्रांतिकारी लढ्यास व विचारांस त्रिवार विनम्र अभिवादन..!!

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे आषाढी निमित्त पांडुरंगाची महापूजा संपन्न

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगाव येथे आषाढी एकादशी निमित्त संस्थानचे महंत ह.भ.प. दत्ता महाराज गिरी यांच्या शुभहस्ते व विठ्ठल खेडकर यांच्या हस्ते सपत्नीक पांडुरंगाची महापूजा करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



आषाढी एकादशी निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव येथे भगवान परमात्मा पांडूरंगाची महापुजा करण्यात आली. यावेळी पूजेचे मानकरी म्हणून कवडगाव येथील विठ्ठल खेडकर यांच्या हस्ते सपत्नीक पुजा झाली. यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे मठाधिपती आशिर्वादमूर्ती महंत दत्ता महाराज गिरी, कैलास महाराज गिरी, खरेदी विक्री संघाचे व्हाईस चेअरमन गणपत राठोड, सेवा सहकारी सोयायटीचे व्हाईस चेअरमन दिलवाले , संस्थान चे सदस्य भीमराव रामराव पांगरे, पत्रकार अविनाश तांदळे, सखाराम गिरी यांच्या सह पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सुनील जाधव यांचा साई पॅलेस बिड येथे शाही विवाह सोहळा संपन्न

बिड ।प्रतिनिधी

श्री.जालंदर शिक्षण संस्था, रायमोह चे अध्यक्ष मा. प्रकाश (आप्पा) जाधव यांचे चिरंजीव मा.सुनील जाधव याचा साई पॅलेस बीड येथे मोठ्या थाटात शाही विवाह सोहळा सपन्न झाला. या प्रसगी अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर दिग्गजानी आपली उपस्थिती दर्शवली होती . या प्रसगी बीड जिल्ह्याचे नवोदित खासदार मा. बजरग (बप्पा ) सोनवणे, माजी मत्री प्रा.सुरेश नवले हे आपल्या पत्नी सह उपस्थित होते. तसेच बीड विधानसभेचे माजी आमदार मा.राजेंद्र जगताप, शिवसग्राम पक्षाच्या नेत्या मा. मेटे मॅडम, भाजपचे बीड जिल्हा अध्यक्ष मा.राजेंद्र मस्के ,मा. अर्जुन क्षिरसागर, रायमोह जि. प. सर्कलचे माजी सदस्य मा. मदन जाधव, शिरूर पचायत समितीचे सभापती मा.जालिंदर सानप, बीड जिल्हा शिवसेना प्रमुख मा.अनिल जगताप, मा. दिलीप गोरे, माजी आमदार मा. अमरसिंह पंडित, श्री. जालदर शिक्षण संस्थेचे सचिव मा. निजामुद्दीन (चाचा) तांबोळी, श्री.जालदर शिक्षण संस्थेचे माजी सचिव तथा रायमोह गावचे माजी उपसरपच मा.मुराद (चाचा) पठाण, श्री.जालदर शिक्षण संस्थेचे



उपाध्यक्ष मा. जानराव (आण्णा ). ढिसले, संस्था सहसचिव मा.फारुख पठाण यांच्या सह रायमोह गावचे माजी सरपच मा.हशम शेख , विघमान सरपच मा.जाधव तसेच स्थानिक रायमोह गावा सह., बारा वाड्या परीसरातील प्रतिष्ठित मान्य वरांचि विशेष उपस्थिती होती, या वेळी श्री. जालदर विद्यालयाचे माजी प्राचार्य मा. दादासाहेब खोले ,मा. प्राचार्य अगद सातपुते, सपादक दिलीप तरकसे श्री.जालदर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यमान प्राचार्य मा. इस्माईल जैनूदिन शेख , पर्यवेक्षक मा.जाधव के.बि.याच्या सह श्री. जालदर विद्यालया चे सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या शाही विवाह सोहळ्यासाठी आलेल्या सर्व अतिथी मान्यवराचे फेटे बाधून स्वागत करण्यात आले. या वेळी श्री.जालदर शिक्षण सस्थेचे विघमान अध्यक्ष मा.प्रकाश (आप्पा) जाधव यानी विवाह सोहळ्यासाठी आलेल्या सर्व अथिती मान्यवराचे आभार व्यक्त करत स्वागत केले . या शाही विवाह सोहळ्या निमित्त आलेल्या सर्व अथिती मान्यवरासाठी मिष्टान्न भोजनाचे आयोजन केले होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT